# आयुर्वेद जनजागृती अभियान - आयुर्वेदीय दिनचर्या तसेच प्रकृती परीक्षण

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग महाराष्ट्र शासन व आयुष् संचालनालय महाराष्ट्र राज्य द्वारा पुरस्कृत "आयुर्वेद जनजागृती अभियाना" अंतर्गत आयुर्वेद शिक्षण मंडळाचे अष्टांग आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय पुणे यांच्यावतीने दिनांक 10 ऑक्टोबर 2023 रोजी श्री अरण्येश्वर शिक्षण संस्थेचे अरण्येश्वर विद्यामंदिर पद्मावती सहकारनगर पुणे येथील 66 शालेय विद्यार्थ्यांना आयुर्वेदीय दिनचर्या तसेच प्रकृती परीक्षण याविषयी आपल्या महाविद्यालयाच्या द्वितीय वर्षाचे विद्यार्थ्यांनी संहिता-सिद्धांत विभागाचे विभागप्रमुख डॉ. मनोजकुमार चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली विस्ताराने वैयक्तिक मार्गदर्शन करण्यात आले. यामध्ये आयुर्वेदीय प्रकृती परीक्षण म्हणजे काय ? तसेच स्वतःची प्रकृती माहीत झाल्यानंतर त्या प्रकृतीनुसार स्वास्थ्यरक्षणासाठी काय खावे, काय खाऊ नये; तसेच वागण्याच्या सवयी कशा असाव्यात याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

या प्रसंगी प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका मा. सौ .अनिता गायकवाड, माध्यमिक शाळेच्या मा. मुख्याध्यापिका डॉ. सौ. भावना जोशी, तसेच वर्गशिक्षिका सौ. ढोबळे आणि सौ. सोनावणे यांची परीक्षणात मोलाची मदत झाली. या संपूर्ण उपक्रमाबद्दल शाळेचे संचालक तसेच मुख्याध्यापक यांनी समाधान व्यक्त केले व भविष्यातही अशा स्वरूपाचे उपक्रम घेण्याविषयी विनंती केली.

या अभियानाचे नियोजन आणि संचालनासाठी आयुर्वेद शिक्षण मंडळाचे सचिव डॉ. मधुकर हरि परांजपे तसेच प्राचार्या प्रा. डॉ. सौ. हेमलता जालगावकर यांनी मार्गदर्शन केले. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी या अभियानाच्या समन्वयक डॉ. सौ. अस्मिता कुबेर यांनी सहकार्य केले.

















आयुर्वेद जनजागृती अभियान

